# दिनांक 03/03/2025

1 दिघी सागरी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/03/2025 रोजी 19:15 वा च्या सुमारास मौजे वांवेपंचतन गावाजवळ, श्रीवर्धन येथे फिर्यादी हे त्याचे मि सह मिनिडोर क्रमाक एम एच 06 जे 1136 ने श्रीवर्धन बोर्लीपंचतन रोडने फिर्यादी याचे राहते घरी येत असताना वावेपंचतन या गावाजवळ आल्यावेळी सदर मिनिडोअरचा आरोपी चालक रा.रानवली ता.श्रीवर्धन याने त्याचे ताब्यातील मिनिडोर अतिवेगाने रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून व हयगयीने निष्काळजीपणे चालवुन मिनिडोअर पलटी होवुन अपघात परिस्थितीकडे दुर्लक्ष करून व हयगयीने निष्काळजीपणे चालवुन मिनिडोर पलटी होवुन अपघात झाला सदर अपघातामध्ये फीर्यादी यांचा मित्र' अजय अरविंद तलसानीया वय-18 वर्ष रा.बोर्लीपचतन याचे दोन्ही पायाना गंभीर दुखापत झाली असल्याने सदर दुखापतीस मिनिडोअरचा चालक कारणीभुत झाला.

याबाबत दिघी सागरी पोलीस ठाणे येथे गु.र.नं.12/2025 भा.दं.वि.क.281,BNS 2023, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 125 a.125b. 184, बी एन एस 2023 125 a.125b. 184 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/चव्हाण ह्या करीत आहेत.

2. पोयनाड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 02/03/2025 रोजी 01:00 वा च्या सुमारास मौजे शहबाज ता.अलीबाग येथील फिर्यादी तसेच साक्षीदार यांचे बंद घरात, अलिबाग अज्ञात चोरटयाने अगर चोरटयांनी फिर्यादी यांचे बंद घराचे दर्शनी दरवाजाचे कडीचा कोयंडा कोणत्यातरी हत्याराने तोडुन त्यावाटे घरात प्रवेश करुन घरातील लोखंडी कपाटाचा दरवाजा कोणत्यातरी हत्याराने तोडुन कपाटात ठेवलेले 53,000/- रुपये क्रिमतीचे सोन्याचे दागिने व चांदीची छत्री घरफोडी चोरी करुन चोरुन नेले तसेच फिर्यादी यांचे प्रमाणेच फिर्यादी यांचे गावातील 03 साक्षीदार यांचे घराचे दरवाजाचे कडीचे कोंडे तोडुन त्यांची एकुण 44,500/- रुपये रोख रक्कम चोरटयांनी घरफोडी चोरी करुन चोरुन नेलेले असुन गावातील 08 साक्षीदार यांचे घरात सुध्दा घरफोडीचा प्रयत्न केला.

याबाबत पोयनाड पोलीस ठाणे येथे गु.र.नं.15/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 331(2),331(3),305(a),62 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/अशोक मरस्कोले हे करीत आहेत.

3. खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 02/03/2025 रोजी 18:30 वा च्या सुमारास मौजे

गगनगीरी आदिवाशी वाडी, ता.खालापुर येथे फिर्यादी व साक्षीदार फिर्यादी त्यांची बहिण साक्षीदार असे वरील ठिकाणी असताना यातील आरोपीत क्र.01 व 02 हे तेथे येवुन आरोपीत क्र 1 याने फिर्यादी यांना म्हणाले की तु माझे बायकोचा तुझया मोबाईलमध्ये डी.पी. का ठेवलास असे म्हणाले असता फिर्यादी यांनी सांगितले की मी माझे बहिणीचा डी.पी. ठेवला आहे. असे म्हणाले असता दोघांच्यात बोलाचाली होवुन आरोपीत क्र 1 व 2 यांनी फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळी दमदाटी करून यातील आरोपीत क्र 2 याने साक्षीदार यांचे कानाखाली मारून त्याने त्यांचे सोबत आणलेला भाजी कापण्याच्या चाकुने फिर्यादी यांचे डावे हाताचे मनगटावर वार करून दुखापत करून तेथुन पळुन गेले.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे गु.र.नं.63/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 118(1),115(2), 352, 351(2), 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोना/लिंबाजी शेडगे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 02.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 150 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 1,42,900/-रुपये इतका दंड आकारला आहे.